अग्रलेखांचा नवाकाळ बादशहा

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवाकाळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा नवाकाळ बादशहा

# मोदींचा चेहरा आणि सरकारचा मुखवटा

कोणताही इतिहास जेव्हा घडतो त्यावेळेला वर्तमानकाळाचे भान ठेवावे लागते. छत्रपती शिवाजी महाराजांनी इतिहास घडवला. किंवा जगामध्ये ज्या ज्या देशामध्ये क्रांती घडून आली त्या त्यावेळेला वर्तमानकाळ महत्त्वपूर्ण ठरलेला दिसून येतो. आतादेखील याच वर्तमानकाळाचा परिणाम असा झाला की भारतामध्ये एका नव्या राजकीय इतिहासाला जन्म घ्यावा लागला. देशाची सध्याची परिस्थिती समाधानकारक नाही. अनेक समस्या आणि प्रश्नांचा डोंगर उभा असताना शासनकर्ते त्याचा गांभिर्याने विचार करत नव्हते.

या परिस्थितीत बदल घडावा अशी त्यांच्यामध्ये इच्छाशक्तीही दिसत नव्हती. शासनकर्त्यांमधल्या स्वार्थीपणाचा इतका कडेलोट झाला की जनतेचीदेखील सहनशक्ती संपली. सरतेशेवटी या शासनकर्त्यांच्या उदासीनतेवर आणि समाजातल्या निराशेवर परिवर्तन हा एकच उपाय शिल्लक राहिला. त्याचा यशस्वी प्रयोग यावेळच्या निवडणुकीत झाला. आणि लोकांच्या मनातील आशाअपेक्षा पुन्हा पल्लवित झाल्या. एखादा झंझावात यावा आणि त्यात घट्ट पाळेमुळे असलेला शंभरदीडशे वर्षांचा वटवृक्षही उन्मळून पडावा तसा प्रकार घडून आला. आणि काँग्रेससारखा एकेकाळचा वटवृक्ष जवळपास भुईसपाट झाला. आज ज्या पक्षाने सतत चाळीस ते पन्नास वर्षांनी या देशावर सत्ता गाजवली. देशाचा राज्य कारभार काँग्रेसशिवाय दुसरा पक्ष चालवूच शकत नाही अशी मक्तेदारी निर्माण झाली होती. किंबहुना या देशात काँग्रेसला पर्यायच नाही असे एक वातावरण आणि मानसिकताही निर्माण झाली होती. त्या ठाम समजूतीला सरळ छेद देण्याचे काम निवडणुकीत झालेले आहे. आता या अभूतपूर्व यशानंतर नरेंद्र मोदींनी 'सबका साथ सबका का विकास' अशी घोषणा दिलेली आहे. ही ते किती सार्थ करून दाखवतात किंवा ही घोषणाच त्यांच्यापुढे एक आव्हान ठरू शकते. कारण मोदी यांचा स्वत:चा प्रवास मुख्यमंत्री ते पंतप्रधान असा झाला आहे. भारताच्या आतापर्यंतच्या राजकीय इतिहासामध्ये दोन किंवा तीनच मुख्यमंत्री असे होते की जे पंतप्रधानपदापर्यंत जाऊन पोहचले.

एक व्ही.पी.सिंग आणि दुसरे एच. डी. देवेगौडा आता हे तिसरेच उदाहरण आहे की, एका राज्याचा मुख्यमंत्री देशाच्या पंतप्रधानपदाची सूत्रे स्वीकारणार आहे. त्यापूर्वीच्या दोन मुख्यमंत्र्यांचे अनुभव लक्षात घेतले तर त्यांना पंतप्रधानपद टिकवता आले नाही. अर्थात त्या दोघांकडे पूर्ण बहुमत नव्हते. आघाडी पक्षांचे प्रतिनिधी म्हणूनच त्यांच्याकडे पंतप्रधानपद चालून आले होते. नरेंद्र मोदी हे सर्वार्थाने या दोघांपेक्षा एक वेगळे उदाहरण ठरू शकते. परंतु एखादे राज्य सांभाळणे आणि दिल्लीत जाऊन सगळ्या देशाचा कारभार हाताळणे यामध्ये निश्चितच मुलभूत फरक पडू शकतो. ही अतिशय महत्त्वाची गोष्ट निकालाच्यादिवशीच मोदी यांच्या लक्षात आली आणि म्हणूनच त्यांनी 'सबका साथ, सबका विकास' म्हणजेच सगळ्यांना बरोबर घेऊन जाण्याची त्यांना गरज वाटली.

### वाजपेयींचाही मुखवटाच होता

जनतेने ज्या तीन प्रमुख कारणांसाठी मोदी यांच्या पारड्यात मते टाकली आहेत त्याचे महत्त्व मोदी यांना तर लक्षात घ्यावे लागेलच. परंतु त्याहीपेक्षा भारतीय जनता पार्टीच्या निवडून आलेल्या खासदारांना त्याकडे अधिक लक्ष द्यावे लागणार आहे. हे तीन मुद्दे म्हणजे भ्रष्टाचार, महागाई, आणि रोजगार. परंतु प्रत्यक्षात त्यांचे सरकार खरा चेहरा दाखवते की, मोदींचे मंत्री मुखवटे घालून काम करते का यावर बरेच काही अवलंबून राहील. कारण साधारणपणे राष्ट्रीय पातळीवरचे राजकारण करताना मुखवटा आणि चेहरा अशा दोन बाबींचे संतुलन साधावे लागेल. ते जर साधता आले नाही. तर कितीही स्वच्छ प्रतिमेचा पंतप्रधान असला तरी तो फार काळ यशस्वी ठरू शकत नाही. याची साक्षात उदाहरणे म्हणजेच अटलबिहारी वाजपेयी आणि मनमोहन सिंग यांची देता येतात. १९९५च्या सुमारासमुध्दा अटलबिहारी वाजपेयी देशाचे पंतप्रधान होणे हे जणू देशाचे भाग्य आहे असे मानले गेले आणि आता देशाला आणि जनतेला पुन्हा एकदा वैभवाचे दिवस येतील. अशी फार मोठी अपेक्षा ठेवली गेली होती. परंतु वाजपेयी यांची स्वच्छ प्रतिमा ही एका जागी राहिली आणि त्यांच्या या प्रतिमेचा मुखवटा म्हणून वापर करून त्यांच्याच मंत्रिमंडळातल्या अनेकांनी काँग्रेससारखाच कारभार केला. त्यावेळच्या एनडीए सरकारचा आदर्श चेहरा म्हणून वाजपेयींना लोकांनी स्वीकारले होते.

पण त्यांच्या पक्षातले अनेक नेते मंत्रिमंडळातले अनेक मंत्री यांचे खरे चेहरे वेगळेच होते. त्यांनी आपला मुळ स्वभाव सोडला नाही फक्त वाजपेयींचा मुखवटा घेऊन ते कारभार करीत राहिले.त्यांनी राज्यकारभारामध्ये पारदर्शकता आणली नाही जे अटलजी आणि अडवाणी भ्रष्टाचाराविरुध्द कठोर भूमीका घेत होते. स्वराज्यातून सुराज्याकडे अशी घोषणा देत ज्या अडवाणींनी रथयात्रा काढली होती त्याच एनडीएच्या सरकारामध्ये भ्रष्टाचाराचीही अनेक प्रकरणे घडली. अगदी घटक पक्षांच्या मंत्र्यांनीदेखील वाजपेयींच्या या प्रतिमेचा मुखवटा म्हणून वापर केला आणि आपला स्वार्थ साधून घेतला म्हणूनच वाजपेयी कितीही आदर्श राजकारणी असले तरी सरकारचा प्रत्यक्ष मुखवटा खूप वेगळा राहिला त्यातूनच लोकांचा अपेक्षाभंग झाला आणि अटलजीसारख्या नेतृत्वाखालील सरकारलादेखील पराभवाचा सामना करावा लागला.

### मनमोहन सिंगांचे असेच झाले

मनमोहन सिंग यांचीदेखील तीच परिस्थिती झाली.त्यांच्यावर कोणतेच आरोप झालेले नाहीत त्यांची प्रतिमा स्वच्छ राहिली. परंतु मनमोहन सिंग यांचा स्वच्छ प्रतिमेचा मुखवटा आणि प्रत्यक्ष भ्रष्टाचाराने बरबटलेल्या सरकारचा चेहरा असा स्पष्ट फरक दिसून आला आणि शेवटी काँग्रेसला दारुण पराभव पत्करावा लागला. त्यापूर्वी काँग्रेसवर तशी फारशी वेळ येत नव्हती.कारण काँग्रेस बोलून चालून भ्रष्टाचारी असल्याचेच मानले जात होते. या पक्षाने स्वच्छतेचा मुखवटा कधीच धारण केलेला नाही आम्ही खातो तुम्हीही खा असा रोखठोक व्यवहार या पक्षाने केला.

नंतर मात्र लोकांचा भ्रमनिरास झाला. मनमोहन सिंग दिसतात तसे त्यांचे सरकार नाही.याची तितकीच रोकडा प्रचिती लोकांना आली. अशा प्रकारचे हे इतिहासातले अनुभव पाहिले तर मोदींच्या या चेहऱ्याचा त्यांच्या सरकारमधले लोक मुखवटा म्हणून वापर करून घेतील. आता निवडून आलेला प्रत्येक खासदार आपला झालेला खर्च वसूल करण्यासाठी कमाईसाठी तुटून पडण्याची शक्यता आहे. गुजरातमध्ये मोदींची स्वच्छ प्रतिमा असली तरी त्यांचे मंत्री त्यांच्याइतक्या स्वच्छ चेहऱ्याचे नाहीत ही आज वस्तुस्थिती आहे. आणि म्हणूनच आता खऱ्याअर्थाने मोदींना मुखवटा आणि चेहरा यातल्या एकाची निवड करावी लागेल किंवा समन्वय तरी साधावा लागेल.